# महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२७१८६

# राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जाहीर आवाहन

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्वप्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी डीबीटी (Mahadbt) पोर्टल दि. ०१/१०/२०१८ पासून नव्याने कार्यान्वीत झाली असून https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळाचा वापर करून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती / फ्रिशिप योजनांकरिता आपले ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केले आहेत. सदर अर्ज आपल्या संबंधित महाविद्यालयाकडून तपासून व पडताळणी करून आपल्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्याकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहेत. महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जावर आपल्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येत आहेत.

## सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी महाडिबीटी पोर्टल शिष्यवृत्ती / फ्रिशिप योजनेचे ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अंतिम मुदतवाढ

या जाहीर आवाहनाद्वारे राज्यभरातील सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे काही तांत्रिक अडचणीमुळे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क व इतर योजनेचे त्रुटी पूर्तता करावयाचे अर्ज तसेच ज्या विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील ऑनलाईन भरावयाचे राहिलेले अर्ज अशा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता महाडिबीटी पोर्टल हे दिनांक : ३०/०६/२०१९ पर्यंत अंतिमतः पुनश्च कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी अंतिम दिनांक : ३०/०६/२०१९ पर्यंत परिपूर्ण ऑनलाईन अर्जाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून महाविद्यालयाकडे अर्ज फॉरवर्ड करावेत.

त्याचप्रमाणे महाविद्यालयाकडून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करावयाचा अंतिम दिनांक : ०२/०७/२०१९ आहे. सदर नमूद केलेल्या अंतिम मुदतीनंतर विद्यार्थी तसेच महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज हे विहित वेळेत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना फॉरवर्ड न केलेले अर्ज प्रणालीतून रद्द पात्र (ऑटो-रिजेक्टेड) ठरविण्यात येतील, याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

या अनुषंगाने आपणास आवाहन करण्यात येते की, उपरोक्त दिलेल्या सूचनांचे पालन न केल्यास व शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या बँक खात्यावर जमा न झाल्यास, तसेच कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच विद्यार्थ्यांची असेल व याबाबत सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी राहणार नाही, याची सर्व प्राचार्य व विद्यार्थ्यांनी कृपया दखल घ्यावी.

## महाविद्यालयांसाठी विशेष सूचना

* आपल्या महाविद्यालयातील / विद्यापीठातील विद्यार्थी प्रतिनिधी (UR, GS, SR) यांना आपल्या स्तरावरून उपरोक्त सूचना विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना त्वरेने कळविण्याचे आवाहन करावेत.
* आपल्या स्तरावरून सदर 'जाहीर आवाहन' महाविद्यालयाच्या मुख्य सूचना फलक तसेच आवश्यकता असल्यास परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात यावेत.

**मिलिंद शंभरकर** (भा. प्र. से.)
आयुक्त- समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

(डीजीआयपीआर- २०१९/२०/८९४)

Daily Lokmat dated 25/06/19

F/O
'copy to all HoDs for display on students' N.B.
'prof. Shimpi for display on website'

25/06/19

25/06/19

25, 2019
lego.com